# के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे उद्या संयुक्त पुण्यतिथी कार्यक्रम

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक तर्फे कै. देवराम सयाजी वाघ तथा कर्मवीर काकासाहेब वाघ, दानशूर रतनशी हरिदास उदेशी तथा काकूशेठ उदेशी व सहकार महर्षी माधवराव ऊर्फ तात्यासाहेब बोरस्ते यांचा संयुक्त पुण्यस्मरण कार्यक्रम २२ जुलै रोजी साजरा केला जातो. सालाबादप्रमाणे यंदाही हा पुण्य स्मरण सोहळा मंगळवार, दिनांक २२ जुलै २०२५ रोजी संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालय येथील मीटिंग हॉल क्र. ०२, चौथा मजला येथे पार पडणार आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक मध्य विधानसभा मतदार संघाच्या आमदार देवयाणी फरांदे उपस्थित राहाणार आहेत. विशेष उपस्थिती म्हणून निफाडचे माजी आमदार अनिल कदम व मराठा विद्या प्रसारण संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले उपस्थित राहणार आहेत. कादवा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्रीराम शेटे हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. कार्यक्रमास ऑनलाईन उपस्थितीसाठी झूम मीटिंग आयडी: ६१३ ५९६ ००७५ आणि पासवर्ड : १२३ असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य बाळासाहेब वाघ व सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी केले आहे.

aapal mahanagar 21-07-2025